साप्ताहिक
# लोकमंगल समूह

अखंड गतीतून सार्थकता

- बुधवार दि. २८ जानेवारी ते ०३ फेब्रुवारी २०२६
- अंक ५१ वा
- वर्ष - १५ वे, पृष्ठ - १२, मूल्य - १ रु.

प्रति,

## शेतीत आधुनिक तंत्रज्ञानाची गरज !



मंद्रूप : दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रूप येथे श्री मळसिद्ध यात्रेनिमित्त आयोजित कृषि प्रदर्शनाचे उद्घाटन उत्साहात पार पडले. यावेळी आजकाल पारंपरिक शेती खर्चिक ठरत असून उत्पन्न आणि खर्चाचा ताळमेळ बसत नाही. त्यामुळे आधुनिक तंत्रज्ञान, सुधारित बियाणे आणि यांत्रिकीकरणाचा वापर केल्यास शेती अधिक फायदेशीर ठरू शकते, असे मत आ. सुभाषबापू देशमुख यांनी व्यक्त केले.

यासोबतच या कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना नवीन शेती तंत्रज्ञान, आधुनिक अवजारे, ट्रॅक्टर, बियाणे व कृषी विषयक माहिती एकाच ठिकाणी मिळत आहे. अशा उपक्रमांमुळे शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन मिळून उत्पादनवाढीस निश्चितच चालना मिळेल, असा विश्वासही व्यक्त केला.

पत्रकार पंचाक्षरी स्वामी यांच्या संकल्पनेतून आणि श्री मळसिद्ध यात्रा समितीच्या पुढाकारातून आयोजित या कृषी प्रदर्शनाचे आ. देशमुख यांनी विशेष कौतुक करून अभिनंदन केले. तसेच, शेतकऱ्यांचा मोठा प्रतिसाद लाभत असलेले हे प्रदर्शन ग्रामीण शेतीसाठी मार्गदर्शक ठरेल, असा विश्वासही यावेळी व्यक्त केला.





भारत सरकारव्दारा नोंदणीकृत

- RNI No. MAHMAR-2010/37971
- Postal Reg. No. SLP/07/2023-2025
- Posted at Solapur Head Post Office on every Friday

# सोलापूर महानगरपालिकेतील नवनिर्वाचित सर्व नगरसेवकांचा सत्कार सोहळा



सोलापूर महानगरपालिकेती नवनिर्वाचित सर्व नगरसेवकांचा सत्कार सोहळा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमारजी गोरे यांच्या उपस्थितीत सोलापूर येथील हॉटेल बालाजी सरोवर येथे अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. लोकशाही प्रक्रियेतून जनतेचा विश्वास संपादन करून निवडून आलेल्या नगरसेवकांचा गौरव करण्याचा हा कार्यक्रम प्रेरणादायी ठरला.

यावेळी नवनिर्वाचित नगरसेवकांचा यथोचित सत्कार करून त्यांना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. नागरिकांच्या अपेक्षांना न्याय देत, शहराच्या सर्वांगीण विकासासाठी समर्पित भावनेने काम करण्याचा संकल्प या प्रसंगी व्यक्त करण्यात आला. हा कार्यक्रम संपूर्णपणे आनंदी, उत्साही आणि सकारात्मक वातावरणात पार पडला.

या सत्कार समारंभास आ. सुभाषबापू देशमुख, आ. देवेंद्र कोठे, आ. सचिन कल्याणशेट्टी, शहर अध्यक्षा रोहिणीताई तडवळकर, जिल्हाध्यक्ष शशिकांतनाना चव्हाण, दिलीप माने, कृषि उत्पन्न बाजार समितीचे संचालक मनीष देशमुख, शिवराज सरतापे यांच्यासह अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली.







संवाद

# महत्त्व - आर्थिक नियोजनाचं

मंडळी
नमस्कार,

नवीन वर्षाची सुरुवात झाली. २०२६ साल उजाडलं. खरं पहायला गेले तर वर्ष कशी भरभर निघून जाताहेत ना! २०२५ साल सुरू झालं म्हणता म्हणता २०२६ साल सुरू झाले. आणि आपण या २०२६ला लगेच सरावलोपण. काल परवापर्यंत तारीख लिहिताना २०२५ लिहणारे आपण आज सहजगत्या २०२६ लिहायला लागलो. असो.

मंडळी वर्ष सरताहेत तेव्हा आपण आपल्या भुतकाळाकडे आणि भविष्यकाळाकडे पहायचं ठरवलं तर काय अनुभव येतो? बाकिच्या सगळ्यागोष्टी बाजूला ठेऊन आजच्या तरुणपिढीनं आर्थिक नियोजनासंबंधी विचार केला तर त्यांना काय वाटतं? असे काहीसे विचार मनात आले आणि मग म्हंटलं याच विषयावर संवादातून तुमच्याशी बोलावं.

मंडळी मागच्या पिढीपेक्षा या आताच्या पिढीला जगण्यासाठी जास्त संघर्ष आहे असं मला वाटतं. कारण मागची पिढी आहे त्यात समाधान मानणारी होती. खूप मोठ्या अपेक्षा नव्हत्या. घर व्यवस्थित चालले, मुलाबाळांचं शिक्षण झालं, स्वतःचं छोटंसं घर, एखादी दोन चाकी गाडी, चटणी-भाकरी का असेना पण समाधानाचं जेवण असेच काहीसे जगण्याविषयीचे विचार होते त्यांचे.

पण आजचा तरूण-त्याची स्वप्नं खूप मोठी आहेत. घर, जागा, बंगला, कार, सोनंनाणं, उच्चशिक्षण, श्रीमंती थाट असा जगण्याचा त्यांचा विचार आहे. 'लाईफ स्टाईल' हटके आणि उन्नत असावी असंही बऱ्याच तरुणांचा विचार असतो. आणि मला वाटतं त्यांच्या काळानुरूप हे योग्यच आहे. मागच्या पिढीवर संस्कार होते 'अंथरूण पाहून पाय पसरा' हे. पण तो संस्कार आजच्या पिढीने बदलला. अंथरूण पाहून पाय पसरण्यापेक्षा अंथरूणच मोठं करू या ना! म्हणजे मग हातपाय आखडून झोपण्यापेक्षा मोकळेपणाने, ऐसपैस झोपता येईल नाही का!

खरं तर मंडळी ही आजची पिढी हुशारच म्हणावी लागेल. मन मारून जगण्यापेक्षा मनाला पटेल ते स्विकारत जगणं त्यांनी निवडलं. आणि मग म्हणूनच कनिष्ठ मध्यम वर्गीय आणि कनिष्ठ वर्गीय घरातली तरूण मंडळी शिक्षणाबरोबरच छोटी-मोठी नौकरीच्या शोधात असतात आणि नौकरी मिळवून आर्थिक पातळीवर स्वतंत्रतेने विचार करतात. खूप लहान वयात पैसा हातात खेळतो. त्या उप्पर आजच्या इंजिनिअर, डॉक्टर वा तत्सम उच्च विद्याशाखेतील विद्यार्थ्याच्या हातात वयाच्या पंचवीशीतच वर्षाला लाखो रूपयांचं पॅकेज मिळतं आणि लहान वयात मिळालेल्या या पैशाला वाटा खूप फुटतात. या तरूणांची आजची नौकरी उद्या आणखीन जोखीम टाकते. मग पैशासाठी खूप पळावं लागतं या पोरांना आणि पस्तीस चाळीशीतच ही मुलं पार थकून जातात.

नौकरीतली आव्हानं वाढलेली असतात. घरच्या जबाबदाऱ्याही या वयात वाढलेल्या असतात. नौकरी व

पैशाच्या मागे लागल्याने प्रकृतीची हेळसांड झालेली असती. आणि काही दुखणी जोर धरतात. शरीर कुरबुरायला लागतं आणि व्याधी शरीरात घर करतात. मग शरीर व मनःस्वास्थ्य बिघडल्याने जगण्यातला आनंद दूर जायला लागतो. अर्थात सगळ्यांच्याच बाबतीत असे घडतंच असं नाही किंवा सगळ्याच तरूणांचे भविष्य असेच असतं असंही नाही. पण मी जेव्हा आजूबाजूला पहातो तेव्हा मोठ्या संख्येने ही बाब मला लक्षात येते.

तर मित्रांनो वयानुरूप किंवा अनुभवाने तुम्हाला प्रमोशन मिळतात, तुमची कमाई वाढते. आणि तसाच तुमचा खर्चही वाढतो. पण मला सांगावसं वाटतं की, कमाई वाढली तरी खर्च वाढू देऊ नका. हौस ही काही काळाची असते पण त्या हौसेखातर आपण खूप अनावश्यक खर्च करत राहतो. 'हौसेला मोल नसतं' असं म्हणतात पण हौसेखातर खूप मोठं मोल आपल्याला चुकवावं लागतं आणि कधी कधी नुकसान सोसावं लागतं. तेव्हा वाढलेले आर्थिक उत्पन्न कुठं चांगल्याठिकाणी गुंतवायला शिका. गुंतवणूक, इन्व्हेसमेंट तुम्हाला शाश्वत स्थैर्य आणि समाधान देणारी बाब आहे हे लक्षात ठेवायला हवं. बऱ्याचदा कामाच्या ठिकाणी बोनस मिळतो. बोनस हा तुमच्या प्रामाणिक कष्टाची पावती असते. तुम्ही केलेल्या उत्तम कामाची शाबासकी असते. तेव्हा आर्थिक स्वरूपात मिळालेला बोनस हा खर्च करण्यासाठीच असतो हा समज काढून टाकून तो बोनस भविष्यकालीन सिक्युरीटीसाठी राखून ठेवा. भविष्यात कधी, कसा पैसा लागेल माहित नसते. तेव्हा हा बोनसचा पैसा तुम्हाला धीर देईल, तुमची गरज भागवेल.

मला अजून एक सांगावसं वाटतं की क्रेडीट कार्ड वापरण्याची खूप लोकांना सवय असते. क्रेडीट कार्ड असणं म्हणजे आपला एक मान समजतात सगळे. पण क्रेडीट कार्ड म्हणजे मोफत मिळणारा पैसा नव्हे तर ते एक प्रलोभन असते तुम्हाला खर्च करायला लावण्याचं. मनात एखादी गोष्ट भरली ती घ्यावी वाटली की आपण लगेच क्रेडिट कार्डचा उपयोग करतो. ज्या क्षणी पैसा जातो तो क्षण आपण गांभिर्यानं घेत नाही तर त्या क्षणापुरता आनंद आपण घेतो पण क्रेडीट कार्ड म्हणजे उसने पैसे घेणं असतं. तो पैसा स्वतःचा किंवा मोफत मिळणार नसतो तर परतफेडीच्या तत्वावर तुम्हाला मिळालेले ते एकअर्थी कर्जच असते. आणि म्हणूनच क्रेडीट कार्ड वापरताना तुम्ही केलेल्या चुका पुढे खूप महागात पडू शकतात. हेही आपण लक्षात घेतलं पाहिजे.

खूप तरूण–तरूणी छोटी मोठी नौकरी करतात. त्यामध्ये त्यांचे सगळं भागतच असं नाही. तेव्हा नौकरी व्यतिरिक्त रहाणारा वेळ, त्यातला एखाद–दुसरा तास साईड इनकम मिळण्यासाठी वापरता येईल का याचा विचार करा. कारण गरजा भागवण्याइतका पैसा मिळवणे हे प्रत्येकाचं कर्तव्यच आहे आणि कधी कधी आर्थिक सुरक्षितेसाठी साईड इन्कमसाठी प्रयत्नशील रहाणे फायद्याचं ठरते.

खरे तर मंडळी याबाबतीत खूप काही सांगण्यासारखं आहे. पण परत कधीतरी पुढच्या संवादमध्ये बोलू. माझ्या आजूबाजूला तरूणांचा मोठा वर्ग आहे. त्यांच्याशी बोलून, त्यांच्याबरोबर राहून मला उमजलेल्या काही गोष्टी मी तुमच्याशी शेअर केल्या. माझं म्हणणं किंवा माझे विचार सर्वतोपरी बरोबर असतीलच असा माझा दावा नाही. कारण प्रत्येक व्यक्ती वेगळी असते. जगण्यासंबंधी विचार जगण्याचे संदर्भ वेगळे असतात. त्यामुळे मी म्हणतो ते सगळं बरोबर असेलच असं नाही. तेव्हा तुम्हाला जे पटेल ते तुम्हाला वाटलं तर स्वीकारा किंवा नाकारा. तो तुमचा हक्क आहे. बरंय तर थांबतो भेटू पुढच्या संवादामध्ये.

तुमचा,

**सुभाष देशमुख**

Email : subhashbapu14@gmail.com

# नांदणी गावातील अखंड हरिनाम सप्ताह – आध्यात्मिक एकतेचा उत्सव !




नांदणी, दक्षिण सोलापूर : दक्षिण सोलापूर तालुक्यातील नांदणी गावामध्ये सलग तिसऱ्या वर्षी अखंड हरिनाम सप्ताह अत्यंत भक्तिभावात आणि उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. आ. सुभाषबापू देशमुख यांनी या सप्ताहात उपस्थित राहून हरिनामाचा आस्वाद घेतला.

या सप्ताहाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे गावातील सर्व नागरिक, महिला भगिनी, युवक आणि ज्येष्ठ नागरिक यांनी एकत्र येत श्रद्धा, शिस्त आणि सामूहिक जबाबदारीने हा उपक्रम यशस्वीपणे पार पाडला. या प्रसंगी सुरवसे, सरपंच बंडे तसेच गावातील विविध मान्यवर आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हरिनामाच्या अखंड गजरामुळे संपूर्ण गावात सकारात्मक ऊर्जा, आपुलकी, एकतेची भावना आणि संस्कारांचे वातावरण निर्माण झाले आहे. अशा अध्यात्मिक उपक्रमांमुळे समाज अधिक सुसंस्कृत, संघटित आणि मूल्याधिष्ठित होत असतो, हे याठिकाणी प्रकर्षाने जाणवले. नांदणी ग्रामस्थांनी जपलेली ही आध्यात्मिक परंपरा निश्चितच प्रेरणादायी आहे. असे मत यावेळी बोलताना आ. सुभाषबापू देशमुख यांनी व्यक्त केले. तसेच त्यांनी यावेळी या पवित्र उपक्रमासाठी सर्व ग्रामस्थांचे अभिनंदन केले आणि अखंड हरिनाम सप्ताहास हार्दिक शुभेच्छा दिल्या.






# लोकमंगल कर्मचारी स्नेहसंवाद । एकजुटीतून समाज व जिल्हा समृद्धीचा निर्धार !




सोलापूर : लोकमंगल परिवाराच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या लोकमंगल कर्मचारी स्नेहसंवाद कार्यक्रमात आ. सुभाषबापू देशमुख यांनी सर्व सहकारी व कर्मचाऱ्यांशी मनमोकळा संवाद साधला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून त्यांनी लोकमंगल परिवाराच्या कार्यपद्धती, मूल्ये आणि सामाजिक बांधिलकी यावर सखोल मार्गदर्शन केले.

या संवादात वित्तीय संस्थांच्या माध्यमातून नागरिकांचा विश्वास जपणे, ग्राहकहित केंद्रस्थानी ठेवून काम करणे, लहान योगदानातून मोठे यश साध्य करणे, डिजिटल मार्केटिंगद्वारे व्यवसायवृद्धी, ग्राहकांशी दीर्घकालीन नाते निर्माण करणे, तसेच समाजासाठी लोकमंगल परिवाराची भूमिका यावर विचार मांडण्यात आले. तसेच, सोलापूर सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून 5 P संकल्पनेवर आधारित सामाजिक कार्याची सविस्तर माहिती देण्यात आली.

लोकमंगल परिवार समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचून प्रभावी आणि परिणामकारक काम करत आहे. स्नेहसंवाद कार्यक्रमांच्या माध्यमातून नागरिकांशी थेट संवाद साधता येत असून, पुढील काळात सोलापूर शहरातील प्रत्येक प्रभाग व जिल्ह्यातील प्रत्येक गावात दर महिन्याला किमान एक सामाजिक उपक्रम राबवण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला. तसेच, तालुका ते गावपातळीवर समित्या स्थापन करून वर्षभर नियोजनबद्ध उपक्रम राबवण्याचेही नियोजन करण्यात आले.

यावेळी रोजगार निर्मिती, उद्योजक घडवणे, महिला सक्षमीकरण, कुटुंबांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे, जिल्ह्याचा शैक्षणिक दर्जा उंचावणे आणि विविध सामाजिक उपक्रम प्रभावीपणे राबवण्यासाठी लोकमंगल परिवारातील सर्व संस्था एकजुटीने कार्य करतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करून एकत्रित प्रयत्नांतून सोलापूर जिल्हा अधिक समृद्ध, सक्षम आणि सुजलाम–सुफलाम होईल, हा दृढ निर्धार या स्नेहसंवादातून अधोरेखित केला.

या कार्यक्रमास लोकमंगल परिवारातील विविध संस्थांचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी व सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# अकोले मंद्रूपची हुरड्यासाठी वेगळी ओळख !



अकोले मंद्रूप ः सोलापूर जिल्ह्यातील प्रत्येक गाव ‘एक गाव – एक उत्पादन’ या संकल्पनेतून आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे, अधिक उत्पादन घेऊन त्याचे योग्य मार्केटिंग व ब्रँडिंग व्हावे, यासाठी आ. सुभाषबापू देशमुख यांचे सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. याच धर्तीवर दक्षिण सोलापूर तालुक्यातील अकोले मंद्रूप या गावाने हुरडा उत्पादन हे आपले वैशिष्ट्य जपले असून गावाला एक वेगळी ओळख मिळवून दिली आहे.

ज्वारीचे कोठार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सोलापूर जिल्ह्यात ज्वारीपासून तयार होणारा हुरडा हा शेतकऱ्यांसाठी उत्पन्नवाढीचा नवा मार्ग ठरत आहे. अकोले मंद्रूप येथील अनेक शेतकरी हुरडा उत्पादनात सक्रिय असून कृषी पर्यटन केंद्रांच्या माध्यमातून पर्यटकांना चविष्ट व नैसर्गिक हुरड्याचा आस्वाद देत आहेत. यामुळे शेतीपूरक व्यवसायातून आर्थिक क्रांती घडविण्याचा सकारात्मक प्रयत्न सुरू आहे.

याच अनुषंगाने सरपंच रमेशअण्णा आसबे यांच्या वतीने आयोजित हुरडा पार्टी व स्नेहसंवाद मेळावा अत्यंत उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास आ. सुभाषबापू देशमुख उपस्थित राहिले आणि त्यांनी हुरड्याचा आस्वाद घेतला तसेच ग्रामस्थांशी व शेतकरी बांधवांशी मनमोकळा संवाद साधला.

तरुणांनी केवळ नोकरीच्या मागे न लागता उद्योजक व्हावे, या उद्देशाने कायम प्रोत्साहन दिले जाते. याच भावनेतून अकोले मंद्रूप येथील मन्मथ पाटील या नवउद्योजकाने नोकरीऐवजी शेतकऱ्यांसाठी ‘रसवंती – रसगाडा’ सुरू करून आत्मनिर्भरतेचा आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्याशी असा आ. देशमुख यांनी संवाद साधून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.





# लोकमंगल पतसंस्थेच्या ७५ शाखांमध्ये एकाचवेळी पत्रकारांचा सन्मान



लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्थेने, महाराष्ट्र राज्य कार्यक्षेत्रातील सामाजिक बांधिलकी जपत बाळशास्त्री जांभेकर जयंती राज्यभर भव्यदिव्य पद्धतीने साजरी करण्यात आली. या निमित्ताने राज्यातील एकाच दिवशी, एकाच वेळी सर्व ७५ शाखांमध्ये पत्रकारांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला.

पत्रकार हा समाजाला दिशा दाखवणारा दीपस्तंभ असून, लोकहितासाठी निस्वार्थ कार्य करणाऱ्या पत्रकार बंधू–भगिनींच्या योगदानाचा गौरव करण्याचा उद्देश या उपक्रमामागे होता. प्रत्येक शाखेमध्ये उपस्थित पत्रकारांना गुलाब पुष्प, स्मरणिका व भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. अनेक ठिकाणी शाखा व्यवस्थापक, कर्मचारी व स्थानिक नागरिकांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

या राज्यव्यापी उपक्रमाला मार्गदर्शन संस्थापक अध्यक्ष आ. सुभाषबापू देशमुख, चेअरमन गुरण्णा तेली, व्हाईस चेअरमन निर्मला कुंभार तसेच सरव्यवस्थापिका अलका देवडकर यांनी केले. लोकमंगल पतसंस्था ही केवळ आर्थिक व्यवहारापुरती मर्यादित नसून समाजहिताचे कार्य सतत करण्याचा आमचा संकल्प आहे, असे यावेळी अधिकाऱ्यांनी सांगितले.

या कार्यक्रमातून लोकमंगल पतसंस्थेने पत्रकारांबद्दलची कृतज्ञता व्यक्त करून सामाजिक जाणीव जागवण्याचा सुंदर उपक्रम राबवला. पत्रकारांनीही संस्थेच्या या आगळ्या–वेगळ्या उपक्रमाचे कौतुक करत आभार व्यक्त केले.




हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक : सचिन हरी जाधव यांनी लोकमंगल प्रिंट अँन्ड पॅक, १२२, इंडस्ट्रियल इस्टेट होटगी रोड, सोलापूर येथे छापून येथेच प्रकाशित केले. बुधवार, दि. २८–०१–२०२६ **मुद्रक-संपादक सचिन हरी जाधव - भ्रमणध्वनी - ९८२३६२५५७९** *RNI No. MAHMAR-2010/37971*

अखंड गतीतून सार्थकता

# लोकमंगल पतसंस्था



## लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर

प्रधान कार्यालय : ९४/२९, मंगल प्लाझा, पहिला मजला, जोडभावी पेठ, सोलापूर.
फोन : ०२१७-२७३५५३७, मो. ९८२३१५४५६९, ९५४५६४२५५५
lokmangalpathho@gmail.com lokmangalpatsanstha

**ठेवीवर १०%* व्याजदर**

महाराष्ट्र राज्य कार्यक्षेत्र
एकूण ७५ शाखेत कार्यरत

२७८३ कोटी व्यवसाय पुर्ती

## दामदुप्पट ८४ महिने

ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग व्यक्ती, विधवा महिला, आजी व माजी सैनिक
व ऑनलाईन माध्यमाने ठेवी आल्यास अर्धा टक्का ज्यादा व्याजदर
फक्त मुली असलेल्या पालकांना एक टक्का ज्यादा व्याजदर

सर्व प्रकारची कर्जे तात्काळ उपलब्ध

१६५२ कोटी ठेवींची पुर्तता

## आकर्षक लाभ देणाऱ्या ठेव योजना

### त्रैवार्षिक ठेव योजना
रु. १८,५००/- भरा,
अवघ्या तीन वर्षात रु. २५,०००/- मिळवा.
रु. ३७,०००/- भरा,
अवघ्या तीन वर्षात रु. ५०,०००/- मिळवा.
रु. ७४,०००/- भरा,
अवघ्या तीन वर्षात रु. १,००,०००/- मिळवा.

### लखपती ठेव
दरमहा १३००/- भरा, ६० महिन्यांनी रु. १,००,०००/- मिळवा.
दरमहा २४००/- भरा, ३६ महिन्यांनी रु. १,००,०००/- मिळवा.

### धनवृध्दी ठेव
दरमहा ५००/- भरा, ११० महिन्यांनी रु.१,००,०००/- मिळवा.
दरमहा २५०/- भरा, ११० महिन्यांनी रु. ५०,०००/- मिळवा.

### लोकमंगल सुकन्या ठेव योजना
आपल्या मुलीच्या उज्ज्वल भवितव्यासाठी
१५ वर्षे दरमहा रु. ५००/- ते रु. १०,०००/- गुंतवा व १८ वर्षानंतर
रु. २,५०,०००/- ते रु. ५०,००,०००/- मिळवा.

नियम व अटी लागू*

G Pay पे Paytm

BHIM UPI

### वक्रतुंड ठेव योजना
ठेवीवर आकर्षक ९% व्याजदर तेही फक्त ९ महिने मुदतीसाठी

### कुबेर ठेव योजना
१०० दिवस मुदतीसाठी ७% व्याजदर

### महिला सन्मान आवर्तक ठेव योजना
दरमहा रू. १००/- ते रू. ५०,०००/- पर्यंत खाते उघडता येईल.
कालावधी (मुदत) २४ महिने राहिल.
पहिला हफ्ता हा संस्था भरेल.

### संस्थेची वैशिष्ट्ये
- तात्काळ सोने तारण कर्ज व लॉकर सुविधा उपलब्ध
- संपूर्ण संगणकीकृत, कोअर बॅकींग प्रणालीद्वारे कार्यरत
- SMS अलर्ट व NEFT / RTGS तसेच QR कोड ची सुविधा
- मोबाईल बँकिंग ॲपची सुविधा उपलब्ध

### सांपत्तिक स्थिती : ३१-१२-२०२५

| तपशील | रक्कम |
|---|---|
| भागभांडवल | ६३ कोटी १५ लाख |
| इतर निधी | ६८ कोटी ४४ लाख |
| ठेवी | १६५२ कोटी ४८ लाख |
| कर्जे | ११३० कोटी ८८ लाख |
| गुंतवणूक व बँक शिल्लक | ६०१ कोटी ५१ लाख |
| संमिश्र व्यवसाय | २७८३ कोटी ३६ लाख |

# मंद्रूप येथील अप्पर तहसीलदार कार्यालयात ७७ वा प्रजासत्ताक दिन साजरा





भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त मंद्रूप येथील अप्पर तहसीलदार कार्यालयात येथे आयोजित शासकीय ध्वजारोहण समारंभास आ. सुभाषबापू देशमुख उपस्थित राहून राष्ट्रध्वजास मानवंदना दिली. यावेळी भारतीय संविधानाने दिलेल्या लोकशाही मूल्यांचे जतन व राष्ट्रसेवेची भावना अधिक बळकट करण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला. देशभक्तीच्या वातावरणात हा समारंभ उत्साहात संपन्न झाला.

या प्रसंगी सरपंच अनिता कोरे, अप्पर तहसीलदार विष्णू बुट्टे, API मनोज पवार, हणमंत कुलकर्णी, प्रशांत कडते, गौरीशंकर मेंडगुदले यांच्यासह परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'सेवा परमो धर्म' – रुग्णांच्या मदतीसाठी खंबीर पाऊल!

माजी सहकार मंत्री, आ. सुभाषबापू देशमुख यांच्या विशेष प्रयत्नातून ऑक्टोबर, नोव्हेंबर आणि डिसेंबर या तीन महिन्यांत १८ गरजू रुग्णांना मुख्यमंत्री सहायता निधीतून एकूण १३ लाख ७५ हजार रुपयांची भरीव मदत मिळवून देण्यात आली आहे. आरोग्यसेवेपासून कोणीही वंचित राहू नये, या ध्येयाने हे कार्य सातत्याने सुरू आहे. मदतीचा हात मिळालेल्या सर्व रुग्णांना उत्तम आरोग्यासाठी शुभेच्छा!




| क्र. | रुग्णाचे नाव | पत्ता | हॉस्पिटलचे नाव | मंजूर निधी |
|---|---|---|---|---|
| 1 | विनोदकुमार ल. चव्हाण | बसवनगर ता.द सोलापूर | कोवाई मेडिकल सेंटर, कोइम्बतुर | 200000 |
| 2 | महादेव पांडुरंग बोडके | माढा | सी.एन.एस.हॉस्पिटल, सोलापूर | 100000 |
| 3 | नागनाथ श्रीकांत स्वामी | हिप्परगा ता. तुळजापूर | बिनीत हॉस्पिटल, सोलापूर | 100000 |
| 4 | पुष्पा बसवराज गिराम | काक्रंबा ता. तुळजापूर | सी.एन.एस.हॉस्पिटल, सोलापूर | 100000 |
| 5 | नंदकुमार नारायण राठोड | मंद्रूप ता.द. सोलापूर | बिनीत हॉस्पिटल, सोलापूर | 100000 |
| 6 | धनाजी गणपत नरळे | वडवळ ता. मोहोळ | यशोधरा हॉस्पिटल युनिट 2, सोलापूर | 90000 |
| 7 | रोहिदास महादेव पवार | रणदिवेवाडी ता. माढा | सी.एन.एस.हॉस्पिटल, सोलापूर | 85000 |
| 8 | रितेश विष्णू माळी | कामती खुर्द ता.मोहोळ | सी.एन.एस.हॉस्पिटल, सोलापूर | 80000 |
| 9 | चंद्रकांत औदुंबर वाघमोडे | रामवाडी, सोलापूर | सी.एन.एस.हॉस्पिटल, सोलापूर | 80000 |
| 10 | विराट मिसलवार | सोलापूर | सी.एन.एस.हॉस्पिटल, सोलापूर | 50000 |
| 11 | निशा सतीश कांबळे | दक्षिण सदर बझार,सोलापूर | स्पॅन हॉस्पिटल, सोलापूर | 50000 |
| 12 | हिरालाल विठ्ठल होटकर | वळसंग ता.द. सोलापूर | मार्कंडेय सह.रुग्णालय, सोलापूर | 50000 |
| 13 | सोमनाथ महादेव बोबे | बार्शी, सोलापूर | सी.एन.एस.हॉस्पिटल, सोलापूर | 50000 |
| 14 | कांताबाई लक्ष्मण भोसले | मुर्दा ता. तुळजापूर | सी.एन.एस.हॉस्पिटल, सोलापूर | 50000 |
| 15 | हाजी मलंग शेख | बार्शी | बिनीत हॉस्पिटल, सोलापूर | 50000 |
| 16 | भाग्यश्री नंदकुमार खंडागळे | उळे ता.द.सोलापूर | संचेती हॉस्पिटल, पुणे | 50000 |
| 17 | भाग्यश्री सागर केवटे | मंद्रूप ता.द. सोलापूर | स्पॅन हॉस्पिटल, सोलापूर | 50000 |
| 18 | अजान तौफिक शेख | शिरवळ ता.द. सोलापूर | स्पॅन हॉस्पिटल, सोलापूर | 40000 |

# लोकमंगल नागरी पतसंस्थेला 'राज्यस्तरीय आदर्श सहकारी संस्था पुरस्कार'



कोल्हापूर : सहकार क्षेत्रात उत्कृष्ट, विश्वासार्ह व समाजोपयोगी कार्य केल्याबद्दल लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर यांना सन २०२५-२६ साठी 'राज्यस्तरीय आदर्श सहकारी संस्था पुरस्कार' प्रदान करण्यात आला. हा सन्मान दैनिक 'रोख ठोक' आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा २०२६ मध्ये कोल्हापूर येथे मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाला.

या भव्य समारंभाला डॉ. विठ्ठल जाधव - सेवा निवृत विशेष पोलिस महानिरीक्षक, डॉ. योगेशकुमार गुप्ता - पोलीस अधीक्षक कोल्हापूर, पद्मश्री उदय देशपांडे, श्री. अशोक रोकडे - संचालक व्हाईट आर्मी कोल्हापूर, ॲड. अतुल वनारसे - हायकोर्ट - सरकारी वकील, डॉ. सदानंद सदाशिव - सहाय्यक समादेशक राज्य राखीव पोलिस दल कोल्हापूर, सुवर्णा पत्की - पोलिस गृह उपविभागीय अधिकारी आदी मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आचार्य सी.ए. डॉ. शंकर अंदाणी - संचालक सीता - साई ट्रस्ट, मोहन गावकर - जाइंट सेक्रेटरी गोवा विधनभवन हे उपस्थित होते.

या सोहळ्यात लोकमंगल पतसंस्थेच्या वतीने पुरस्कार स्वीकारण्यासाठी तज्ञ संचालक विठ्ठल ढेकळे, वरिष्ठ अधिकारी अतुल जगदाळे, विभागीय अधिकारी रेवण सिद्धापुरे, शाखाधिकारी कुंदन ताकमोगे व अतुल काळे हे उपस्थित होते.

लोकमंगल पतसंस्थेच्या या यशामागे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आ. सुभाष देशमुख, चेअरमन गुरण्णा तेली, व्हाईस चेअरमन निर्मला कुंभार, व्यवस्थापकीय संचालक मनीष देशमुख, सरव्यवस्थापिका अलका देवडकर तसेच संपूर्ण संचालक मंडळ यांचे उत्कृष्ट नियोजन, पारदर्शक धोरणे व मार्गदर्शनाचे मोलाचे योगदान आहे, असे गौरवोद्गार यावेळी काढण्यात आले.

लोकमंगल पतसंस्थेचे महाराष्ट्र राज्यभर कार्यक्षेत्र असून, पश्चिम महाराष्ट्रातील क्रमांक एक सहकारी पतसंस्था म्हणून ओळखली जाते. संस्थेच्या सध्या राज्यात ७५ शाखा कार्यरत असून, त्यापैकी २५ शाखा स्वमालकीच्या इमारतीत चालू आहेत.

३१ डिसेंबर २०२५ रोजी संस्थेचा एकूण व्यवसाय ३००० कोटी रुपयांच्या घरात पोहोचला आहे. ठेवी - १६५२ कोटी ४८ लाख रुपये, कर्जे - ११३० कोटी ८८ लाख रुपये, गुतवणूक व बँक शिल्लक - ६०१ कोटी ५१ लाख रुपये, तर संस्थेचा स्वनिधी १३१ कोटी ५९ लाख अशी संस्थेची आर्थिक स्थिती अत्यंत भक्कम आहे.

संस्थेकडून ठेवींवर १०% पर्यंत व्याजदर, विधवा महिला, ज्येष्ठ नागरिक व दिव्यांगांसाठी आणि आजी / माजी सैनिक यांना अर्धा टक्का जादा व्याजदर आणि महिला सन्मान आवर्तक ठेव योजना, सुकन्या ठेव योजना इत्यादी विशेष योजना तसेच घरकर्ज, वाहनकर्ज, व्यवसाय कर्ज व वैयक्तिक कर्जासह सर्व प्रकारची कर्जे सुलभ अटींवर उपलब्ध आहेत. या भक्कम व पारदर्शक कामगिरीची दखल घेत लोकमंगल पतसंस्थेला राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.